# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे व पालघर जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक २७/२०१९ | दिनांक ०२/०४/२०१९ | कालावधी ५ दिवस


डॉ. सुभाष चव्हाण, विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग ९४२२४३१०६७

डॉ. विजय मोरे, नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग ९४२२३७४००१

डॉ. शितल यादव, तांत्रिक अधिकारी कृषिविदया विभाग ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २७/०३/२०१९ ते ०२/०४/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०३/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून ०७/०४/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७/०३ | २८/०३ | २९/०३ | ३०/०३ | ३१/०३ | ०१/०४ | ०२/०४ | | ०३/०४ | ०४/०४ | ०५/०४ | ०६/०४ | ०७/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३९.६ | ३४.८ | ३१.८ | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३४ | ३५ | ३२ | ३३ |
| २१.० | २०.४ | २०.४ | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २१ | २२ | २३ | २१ | २१ |
| ० | ० | ० | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | ० |
| ६८ | ७७ | ९० | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ५८ | ५० | ५९ | ६७ | ५३ |
| ५१ | ५९ | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३२ | २६ | २५ | ३४ | ३१ |
| ४.८ | ३.५ | २.९ | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ५ | ७ | ९ | ५ |
| नै.द. | शांत | शांत | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | नै.प. | नै. | नै.प. | पू. | ई.उ. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | २३५९.६ |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ३ ते ७ एप्रिल, २०१९ पर्यंत कमाल व किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| उन्हाळी भात | पोटरी ते लोंबी बाहेर येण्याची अवस्था | • भात पिकात लोंब्या येण्यापूर्वी दहा दिवस व लोंब्या आल्यानंतर दहा दिवसांपर्यंत शेतामध्ये पाण्याची पातळी १० सें. मी. पर्यत ठेवावी. |
| आंबा | फलधारणा अवस्था (सुपारी ते अंडाकृती अवस्था) | • आंबा पिकामध्ये फळांवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची व त्यामुळे फळगळ होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंबा पिकामध्ये फळांवर फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ टक्के प्रवाही २.५ मि. ली. किंवा थायेमेथॉक्झाम २५ टक्के २ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. उन्हाळ्यात पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी द्यावे. |
| नारळ | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| चिकू | फुलोरा व फलधारणा | • चिकू पिकामध्ये फुलकळी पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस. जी. ४.५ ग्रॅम किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि. ली. किंवा प्रोफेनोफोस ४० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी ५० टक्के फुले आल्यावर एकूण तीन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने मार्च, एप्रिल व मे मध्ये कराव्यात. तसेच किडीच्या सर्वेक्षणासाठी निळ्या रंगाच्या प्रकाशसापळा बागेत बसवावा.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, चिकू बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा. |
| केळी | - | • बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, केळी बागेत आठवडयातून दोन वेळा पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आच्छादनाचा वापर करावा.<br>• फुलोऱ्यावर आलेल्या केळीच्या झाडाला काठीचा आधार द्यावा तसेच प्रखर सूर्यकिरणाने घडाचे भाजून नुकसान होवू नये म्हणून केळीच्या पानाने किंवा गोणपाठाने घड झाकून घ्यावा. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फुलोरा | • उन्हाळी भेंडी पिकास नत्राचा दुसरा हप्ता ७२ किलो युरीया प्रती हेक्टरी या प्रमाणात लागवडीनंतर एका महिन्यांनी देण्यात यावा.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने, फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेतील गवत काढून स्वच्छता ठेवावी व गरजेनुसार रोपांसाठी सावली करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याचा हौद किंवा टाकी पंधरा दिवसांतून एकदा संपूर्ण कोरडी करून त्याला आतून चुना लावावा. त्यामुळे शेवाळ वाढ होण्यास प्रतिबंध होवून पाणी थंड राहून त्यातून कॅल्शियमचाही पुरवठा होण्यास मदत होईल.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे/कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या / शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल.<br>• जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**